Publication. Navshakti
Date: 15/2/2019
Page: 26
Column: 1



## थोडक्यात

### अदानी इलेक्ट्रिसिटीतर्फे इलेक्ट्रिक स्माइल्सची घोषणा

मुंबई–अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लि. (एईएमएल)ने आज 'इलेक्ट्रिक स्माइल्स' या ग्राहकांना रिवॉर्ड मिळवून देणाऱ्या लॉयल्टी उपक्रमाची घोषणा केली. चेक, वेबसाइट, मोबाइल ॲप आणि इतर ऑनलाइन पेमेंट व्यासपीठांच्या माध्यमातून बिलांचा भरणा करणाऱ्या ग्राहकांना इलेक्ट्रिक स्माइल्स कमावता येतील. खरेदीवरील खास डील्स आणि डिस्काऊंट मिळवण्यासाठी या स्माइल्सचा वापर करता येईल. प्रत्येक इलेक्ट्रिक स्माइलचे मूल्य एक रुपया असेल. चेक पेमेंट केल्यास दर १०० रुपयांमागे ग्राहकाला २ इलेक्ट्रिक स्माइल्स मिळतील. तर, ऑनलाइन पेमेंटसाठी दर १०० रुपयांमागे ३ इलेक्ट्रिक स्माइल्स मिळतील. अदानी इलेक्ट्रिसिटीतर्फे प्रॉम्प्ट पेमेंट इसेंटिव्हस ही खास ऑफरही देण्यात येत आहे. यानुसार, बिल तयार होण्याच्या म्हणजेच जनरेशनच्या तारखेनंतर ७ दिवसांच्या आत बिलाचा ऑनलाइन भरणा करणाऱ्या ग्राहकांना दर १०० रुपयांमागे ४ इलेक्ट्रिक स्माइल्स मिळतील. फूड ॲण्ड बेव्हरेजेस, होम फर्निशिंग, कपडे, आरोग्य आणि वेलनेस, ॲक्सेसरी आणि या प्रकारच्या इतर खरेदीसाठी खास ऑफर्स आणि डिस्काऊंट्सच्या माध्यमातून या स्माइल्स वापरता येतील.